R.No. MHHMAR/25/A3029

R.No. MHHMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ६ वे, अंक नं. : ४१

दि. २२ जानेवारी २०२६, वार :गुरुवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रु.

दैनिक

# महावृत्त

E-mail : dainikmhavratt@gmail.com

संपादक - अशोक हनवते मो. 9421094991, 7264079990

## आशियातील सर्वात मोठा विकेंद्रित सौर ऊर्जा कार्यक्रम राबवून महाराष्ट्राने रचली यशोगाथा सौर ऊर्जेच्या माध्यमातून वर्षअखेरपर्यंत १६ गिगावॅट वीज निर्मिती - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

दावोस : महाराष्ट्राने आशियातील सर्वात मोठा विकेंद्रित सौर ऊर्जा कार्यक्रम राबवून यशोगाथा रचली आहे, असे नमूद करून या वर्षाच्या अखेरपर्यंत १६ गिगावॅट वीज सौर ऊर्जेच्या माध्यमातून उपलब्ध होईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

वर्ल्ड ईकॉनॉमिक फोरमच्या वार्षिक बैठकीच्या निमित्ताने इंडिया पॅव्हेलियनमध्ये इंटरनॅशनल सोलर अलायन्सच्या वतीने आयोजित 'स्केलिंग सोलर एनर्जी व्हेअर इट मॅटर' या विषयावर मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी मांडणी केली. यावेळी केंद्रीय नवीन आणि नवीकरणीय ऊर्जा मंत्री प्रल्हाद जोशी आदी मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी रूफटॉप सोलर, सौर पंप, अब्जावधींची वीजखर्च बचत, कार्बन उत्सर्जनात मोठी घट, तसेच सौरऊर्जा, बॅटरी स्टोरेज आणि पंप स्टोरेजद्वारे भविष्यात राज्य व राष्ट्रीय वीज ग्रीड स्थिर करण्याच्या योजनांची माहिती दिली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, महाराष्ट्राने दशकापेक्षा कमी काळात संपूर्ण ऊर्जा क्षेत्राचा चेहरामोहरा बदलून टाकला आहे. महाराष्ट्रातील वीज ग्राहकांमध्ये १० टक्के हे कृषि पंपधारक आहेत, जे एकूण विजेच्या ३०% वीज वापरत होते. त्यांना वीज पुरवठा करण्याचा खर्च प्रति युनिट ८ रुपये होता, तर त्यांच्याकडून फक्त १ रुपया आकारला जात असे. उर्वरित ७ रुपये राज्याकडून किंवा 'क्रॉस सबसिडी'च्या स्वरूपात दिले जात होते, ज्यामुळे औद्योगिक आणि इतर ग्राहकांसाठीच्या विजेच्या दराचा भार वाढत होता. हे एक दुष्टचक्र होते. मात्र, प्रधानमंत्री नरेंद्र मोदीजींच्या दूरदृष्टीने आम्ही शेतीचा संपूर्ण वीज भार सौर ऊर्जे वर हलवण्याचा निर्णय घेतला. आशियातील सर्वात मोठी 'विकेंद्रित सौर ऊर्जा योजना' सुरू केली. याद्वारे प्रत्येक कृषी फिडर स्वतंत्रपणे सौरऊर्जे वर आणला गेला. शेतकऱ्यांना वीज पुरवण्यासाठी आम्ही स्वतंत्र कंपनी स्थापन केली. आता या वितरण




प्रणालीद्वारे सुमारे १६ गिगावॅट वीज निर्माण केली जाईल आणि या वर्षाच्या अखेरीस आम्ही हा प्रकल्प पूर्ण करू. हे काम प्रगतीपथावर आहे. आम्ही दरमहा सुमारे ५०० मेगावॅट समर्पित करत आहोत आणि लवकरच १ गिगावॅट वीज निर्मिती पर्यंत पोहोचू. या दरम्यान, शेतकऱ्यांना वीज पुरवठ्याचा जो खर्च ८ रुपये होता, तो आता ३ रुपयांपेक्षा कमी झाला आहे. यामुळे उद्योग आणि घरगुती ग्राहकांवरील खर्चाचा बोजा कमी झाला असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

महाराष्ट्रात 'पीएम सूर्य घर योजना' उत्तमरित्या राबविली जात आहे. यातून सुमारे ४ गिगावॅट क्षमतेचे रूफटॉप सोलर संयत्र कार्यान्वित होणार असल्याचे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, यातून आता केवळ घरा-घरासाठी वीज मिळते आहे, असे नाही, तर ती प्रकाशाने उजळून निघताहेत. शिवाय यातून शिल्लक वीज ग्रीडलाही पुरवली जात आहे. यामुळे कार्बन उत्सर्जनाचे प्रमाण कमी होऊ लागले आहे. आम्ही आता केंद्र कृषि पंपाच्या नवीन जोडण्यांसाठी केंद्र सरकारच्या योजनेच्या धर्तीवर ' मागेल त्याला सौर पंप' योजना सुरू केली. यात संपूर्ण भारतात जेवढे सौर पंप बसवले आहेत, त्यापैकी ६०% महाराष्ट्रात आहेत. लवकरच ही संख्या १० लाखांच्या पार जाईल. याचा परिणाम असा झाला आहे की, पुढील ५ वर्षांसाठी आमचा 'मल्टी-इयर टॅरिफ' (विजेचे दर), जो दरवर्षी ९% ने वाढत होता, तो आता कमी होत आहे. पुढील ५ वर्षांत आम्ही वीज खरेदीच्या खर्चात १० अब्ज डॉलर्सची बचत करू, असेही त्यांनी सांगितले.

सौरऊर्जा कार्यक्रमामुळे होणारी कार्बन उत्सर्जन कपात ही ३०० कोटी झाडे लावण्याइतकी असल्याचे सांगून मुख्यमंत्री म्हणाले की, २०३२ पर्यंत आम्ही आणखी ४५ गिगावॅट वीज निर्माण करू, ज्यापैकी ७०% सौर ऊर्जा असेल. ३-४ वर्षांपूर्वी आमचे नूतनीकरणक्षम ऊर्जेचे प्रमाण १३% होते, जे २०३० पर्यंत ५२% होईल. ग्रीड स्थिर करण्यासाठी आम्ही बॅटरी स्टोरेज आणि पश्चिम घाटातील भौगोलिक परिस्थितीचा फायदा घेत 'पंप स्टोरेज' प्रकल्पांवर भर देत आहोत. आम्ही ८०,००० मेगावॅट क्षमतेचे पंप स्टोरेज प्रकल्प सुरू केले आहेत, जे लवकरच एक लाख मेगावॅटपर्यंत पोहोचतील, असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

## निवडणूक काळात कायदा व सुव्यवस्था कायम राखण्यासाठी आवश्यक प्रतिबंधात्मक उपाययोजना राबवा-जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे

लातूर, : राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाला आहे. त्यानुसार ५ फेब्रुवारी रोजी मतदान होणार असून ७ फेब्रुवारी रोजी मतमोजणी होईल. ही निवडणूक प्रक्रिया शांततापूर्ण व पारदर्शक वातावरणात पार पाडण्यासाठी सर्वांनी समन्वयाने काम करणे आवश्यक आहे. निवडणूक काळात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्यासाठी आवश्यक प्रतिबंधात्मक उपाययोजना प्रभावीपणे राबविण्याच्या सूचना जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी आज येथे दिल्या.




निवडणूक काळातील कायदा व सुव्यवस्थेच्या अनुषंगाने आयोजित बैठकीत जिल्हाधिकारी बोलत होत्या. यावेळी पोलीस अधीक्षक अमोल तांबे, अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, सामान्य प्रशासनच्या उपजिल्हाधिकारी सायली ठाकूर, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी तथा आदर्श आचारसंहिता कक्षाचे नोडल अधिकारी असलम तडवी, निवडणूक खर्च संनियंत्रण कक्षाचे नोडल अधिकारी राजेंद्र नागणे, राज्य उत्पादन शुल्कचे अधीक्षक केशव राऊत उपस्थित होते. तसेच सर्व निवडणूक निर्णय अधिकारी, तहसीलदार व उपविभागीय पोलीस अधिकारी हे दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठकीत सहभागी झाले होते.

जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणुकीत आदर्श आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी करणे, निवडणूक प्रक्रिया भयमुक्त व पारदर्शक वातावरणात पार पाडणे यासाठी सर्व संबंधित अधिकाऱ्यांनी समन्वयाने काम करणे आवश्यक आहे. निवडणूक काळात कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी आवश्यक प्रतिबंधात्मक उपाययोजना तातडीने राबविण्यासह मतदान केंद्र व मतमोजणी केंद्र परिसरातील सुरक्षा नियोजनाला प्राधान्य द्यावे. एकाच ठिकाणी पाचपेक्षा अधिक मतदान केंद्र असल्यास, अशा ठिकाणी संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी व पोलीस अधिकारी यांनी संयुक्तपणे प्रत्यक्ष भेट देऊन आढावा घ्यावा. याठिकाणी मतदारांची कोणत्याही प्रकारे गैरसोय होणार नाही, याची दक्षता घेण्याच्या सूचना जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी दिल्या. तसेच आदर्श आचारसंहिता भंगाची बाब निदर्शनास आल्यास तातडीने गुन्हा दाखल करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

अतिरिक्त बंदोबस्त तैनात केला जाणार : पोलीस अधीक्षक अमोल तांबेजिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या काळात ग्रामीण भागात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी पोलीस प्रशासनाने आवश्यक पूर्वतयारी केली आहे. प्रत्येक तालुक्यात नोडल अधिकारी नियुक्त करण्यात आले असून मतदान व मतमोजणी या दोन दिवसांचा सुरक्षा आराखडा तयार करण्याची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे. जिल्ह्यात बाहेरून पोलीस अधिकारी व कर्मचारी येणार असून सुरक्षेच्या दृष्टीने पुरेसा बंदोबस्त तैनात केला जाईल. प्रत्येक तालुकास्तरीय पोलीस नोडल अधिकाऱ्यांनी संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांशी समन्वय ठेवून बंदोबस्ताचे नियोजन करावे, अशा सूचना जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी दिल्या.

पोलीस विभागामार्फत करण्यात आलेल्या नियोजनाची माहिती अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांनी दिली. तसेच निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके व उपजिल्हाधिकारी सायली ठाकूर यांनी निवडणूक काळात कायदा व सुव्यवस्थेच्या अनुषंगाने महत्त्वपूर्ण बाबींची माहिती दिली.

## बजाज पुणे ग्रँड टूर २०२६ : ल्यूक मडग्वेचे वर्चस्व कायम; 'मराठा हेरिटेज सर्किट'मध्ये सलग दुसरा विजय

पुणे : पुण्यात आयोजित ऐतिहासिक 'बजाज पुणे ग्रँड टूर २०२६' या आंतरराष्ट्रीय सायकलिंग स्पर्धेने दुसऱ्या दिवशी अधिकच थरारक वळण घेतले. 'मराठा हेरिटेज सर्किट' या दुसऱ्या टप्प्यात चीनच्या 'ली निंग स्टार' संघाचा सायकलपटू ल्यूक मडग्वे याने सलग दुसरा विजय मिळवत 'यलो जर्सी'वरील आपले वर्चस्व कायम राखले. या वेळी आमदार भीमराव तापकीर आणि पुणे महानगरपालिकेचे आयुक्त नवलकिशोर राम आदी मान्यवरांच्या हस्ते यशस्वी सायकलपटूंचा गौरव करण्यात आला.आजचा दुसरा टप्पा 'मराठा हेरिटेज सर्किट' अंतर्गत १०५.३ किलोमीटरचा होता. पुण्याच्या कॅम्प परिसरातील लेडीज क्लब येथून दुपारी १२.३० वाजता शर्यतीला प्रारंभ झाला, तर सिंहगड रोडवरील नांदेड सिटी येथे समारोप झाला. डोंगराळ भूभाग, तीव्र चढ-उतार आणि वळणावळणाचे रस्ते यामुळे हा टप्पा सायकलपटूंच्या ताकद, तंत्र आणि सहनशक्तीची कसोटी पाहणारा ठरला.ल्यूक मडग्वे याने ०२:३१:४९ या वेळेत शर्यत पूर्ण करत प्रथम क्रमांक पटकावला. थायलंडच्या 'रुजाई इन्शुरन्स' संघाचा ॲलन कार्टर बेटल्स दुसऱ्या, तर बेल्जियमचा यॉर्बन लॉरिसेन तिसऱ्या क्रमांकावर राहिला.




दुसऱ्या टप्प्यानंतर विविध श्रेणींतील जर्सी विजेते पुढीलप्रमाणे ठरले आहेत: यलो जर्सी (एकूण आघाडी) : ल्यूक मडग्वे (चीन), पोल्का डॉट जर्सी (किंग ऑफ द माउंटेन्स) : स्टीफन बेनेटन (गुआम), ऑरेंज जर्सी (सर्वोत्कृष्ट आशियाई सायकलपटू) : जंबालजाम्ट्स सेनबायर (मंगोलिया/स्पेन), व्हाईट जर्सी (सर्वोत्कृष्ट युवा सायकलपटू) : तिजसेन विगो (नेदरलँड्स), तर ब्ल्यू जर्सी (भारताचा सर्वोत्तम सायकलपटू) : मनव सरदा (इंडियन डेव्हलपमेंट टीम). ही स्पर्धा भारतातील सायकलिंग क्षेत्रासाठी मैलाचा दगड ठरत असून णउख २.२ श्रेणीतील ही देशातील पहिली पाच दिवसांची मल्टि-स्टेज 'कॉन्टिनेंटल सायकल रेस' आहे. पाच खंडांतील ३५ देशांचे १७१ आंतरराष्ट्रीय दर्जाचे सायकलपटू या स्पर्धेत सहभागी झाले आहेत. एकूण ४३७ किलोमीटरचा मार्ग पुणे जिल्ह्यातील ९ तालुके आणि १५० गावांतून जात असून, अवघ्या ७५ दिवसांत जागतिक दर्जाच्या या स्पर्धेसाठी रस्ते व पायाभूत सुविधा अद्ययावत करण्यात आल्या आहेत.

विजयानंतर बोलताना ल्यूक मडग्वे म्हणाला, आजचा दिवस अत्यंत उष्ण होता आणि चढाव खूप आव्हानात्मक होते; मात्र संघातील सहकाऱ्यांच्या उत्तम साथीतून हा विजय मिळवता आला.स्पर्धेचा तिसरा टप्पा उद्या, २२ जानेवारी २०२६ रोजी 'वेस्टर्न घाट गेटवे' अंतर्गत पुरंदर ते बारामती (१३४ किमी) दरम्यान पार पडणार असून, या टप्प्यात पुणेकरांना जागतिक दर्जाच्या सायकलपटूंच्या वेगवान आणि थरारक कामगिरीचा अनुभव घेता येणार आहे.

## संपादकीय...

### एससी की ओबीसी? : लातूर महापालिकेच्या नेतृत्वाचा आजचा टर्निंग पॉईंट

मुंबईमध्ये राज्यातील महापौर पदाचे आरक्षण आज जाहीर होणार आहे.लातूर शहर महानगरपालिका मध्ये ओबीसी प्रवर्गासाठी आरक्षण सुटण्याची दाट शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे लातूरच्या राजकारणात उत्सुकता, तर्क-वितर्क आणि दबावाचे राजकारण शिगेला पोहोचले आहे. कारण हा निर्णय केवळ एका पदापुरता मर्यादित नसून, शहराच्या पुढील पाच वर्षांच्या नेतृत्वाची दिशा ठरवणारा आहे.

एससी आरक्षण : सामाजिक न्याय की प्रतीकात्मक नेतृत्व?

जर महापौरपद अनुसूचित जाती (एससी) साठी राखीव झाले, तर तो सामाजिक न्यायाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा क्षण ठरेल. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये प्रतिनिधित्व मिळाले असले, तरी सर्वोच्च पदावर एससी समाजातील व्यक्ती बसणे हे अजूनही अपवादात्मकच मानले जाते. विशेषतः महिला आरक्षणासह एससी प्रवर्ग आल्यास, हे दुहेरी सक्षमीकरण ठरेल.

मात्र येथे धोका देखील तितकाच मोठा आहे. जर एससी आरक्षणातून निवडलेले नेतृत्व केवळ 'नाममात्र' राहिले, निर्णयप्रक्रिया इतरांच्या हातात राहिली, तर आरक्षणाचा हेतूच धूसर होईल. त्यामुळे एससी महापौर म्हणजे केवळ सामाजिक चेहरा नव्हे, तर प्रशासनावर पकड असलेले, निर्णयक्षम नेतृत्व असणे गरजेचे आहे.

ओबीसी आरक्षण : संख्याबळाचे नेतृत्व की जबाबदारीची परीक्षा?

दुसरीकडे, ओबीसी आरक्षण सुटल्यास राजकीय समीकरणे अधिक तीव्र होतील. ओबीसी समाज हा लातूर शहरात संख्येने मोठा आणि राजकीयदृष्ट्या प्रभावी आहे. त्यामुळे ओबीसी आरक्षण आल्यास इच्छुकांची संख्या वाढेल, अंतर्गत स्पर्धा तीव्र होईल आणि पक्षांतर्गत गटबाजी उघडपणे समोर येईल.

ओबीसी महापौर ही संकल्पना केवळ संख्याबळाचे प्रतिनिधित्व नसून, त्या समाजाच्या अपेक्षा पूर्ण करण्याची जबाबदारी घेणारी असावी. अन्यथा आमचाच माणूस या भावनेतून निवड झाली, पण कामगिरीत अपयश आले, तर त्याचा फटका संपूर्ण समाजाच्या राजकीय विश्वासाला बसू शकतो.

सत्ताधाऱ्यांची खरी परीक्षा

लातूर महापालिकेत सध्या स्पष्ट बहुमत असलेल्या सत्ताधारी आघाडीसमोर हा निर्णय संधी आणि कसोटी दोन्ही ठरणार आहे. एससी असो वा ओबीसी आरक्षण जाहीर होताच अनेक दावेदार रिंगणात उतरतील. पण इथे प्रश्न असा आहे की निवड क्षमता पाहून होणार की समीकरण पाहून?

महापौरपद अधिकारांनी मर्यादित असले, तरी राजकीयदृष्ट्या अत्यंत प्रभावी आहे. शहराचा चेहरा, प्रशासनाशी संवाद आणि विकासाची दिशा ठरवण्याची भूमिका या पदातूनच ठरते. त्यामुळे आरक्षण कोणतेही असो, महापौर केवळ समाजाचे प्रतिनिधी न राहता संपूर्ण शहराचे नेतृत्व करणारे असावेत, हीच लातूरकरांची अपेक्षा आहे.

निष्कर्ष

आजचा दिवस लातूर महापालिकेसाठी निर्णायक आहे. एससी किंवा ओबीसी आरक्षण हा केवळ प्रशासकीय निर्णय नाही, तर लोकशाहीचा आरसा आहे. या आरशात सामाजिक न्याय, राजकीय प्रामाणिकपणा आणि नेतृत्वाची गुणवत्ता दिसेल की केवळ सत्तेची गणिते, हे लवकरच स्पष्ट होईल.

आरक्षण जाहीर होईल; नावे चर्चेत येतील. पण शेवटी एकच प्रश्न उरेल

लातूरला केवळ आरक्षित महापौर हवा आहे, की सक्षम महापौर?

या प्रश्नाचे उत्तरच पुढील पाच वर्षांचे भविष्य ठरवणार आहे.

# नेताजी सुभाषचंद्र बोस देशाचे तेजोमय क्रांतीकारी योध्दा.

भारत स्वातंत्र्य करण्यासाठी देशात दोन नद्यांचा उगम झाला.एक मवाळवादी तर दुसरी जहालवालवादी यांच्या संगमानेच १५ ऑगस्ट१९४७ ला भारत स्वतंत्र झाला.२३ जानेवारी १८९७ला ओडिसा मधील कटक शहरात जन्माला आलेले नेताजी भारतासाठी चमकता तारा सिध्द झाले व स्वतंत्र भारतासाठी महान योध्दा म्हणून उदयास आले. नेताजींनी १५ वर्षाच्या वयातच स्वामी विवेकानंदांचे सर्व साहित्य वाचून काढले व देश निर्माण करण्याची ज्वाला प्रज्वलित झाली आणि देश स्वतंत्र करण्यासाठी संपूर्ण ताकदीनिशी संघर्षाला सुरुवात केली.कोलकत्यातील जेष्ठ स्वातंत्र्य सैनिक देशबंधू चित्तरंजन दास यांच्या कार्याने नेताजी प्रभावीत झाले व त्यांच्या सोबत काम करायला सुरुवात केली. २० जुलै १९२१ रोजी महात्मा गांधी व सुभाषचंद्र बोस सर्वप्रथम एकमेकांना भेटले.यावेळी गांधींजींनीसुध्दा नेताजींना दासबाबू सोबत काम करण्याचा सल्ला दिला.कारण चित्तरंजन दास हे बंगाली वकील व भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील अग्रणी पुढारी होते.त्यामुळे त्यांना देशबंधू असे संबोधले जात असे. १९२५ साली इंग्रजांच्या लक्षात आले की नेताजी क्रांतीकारकांशी संबंध ठेवतात व क्रांतीकारकांचे स्फुर्तीस्थान असल्याचे त्यांच्या लक्षात आले.ह्या कारणास्तव इंग्रज सरकारने सुभाषबाबूंना अटक केली व कोणताही खटला न चालवीता त्यांना अनिश्चित काळासाठी म्यांमारच्या कारागृहात बंदिस्त केले.नेताजींचा संपूर्ण प्रवास अत्यंत संघर्षमय व खडतड रहाला. कारण त्यांच्या व सहकाऱ्यांच्या रक्ताता-रक्तात स्वातंत्र्याची ज्वाला धगधगत होती.त्यांचे एकच स्वप्न होते ते म्हणजे भारत स्वतंत्र करणे यासाठीच त्यांनी विदेशी वारी करून इंग्रजाच्या दुश्मन राष्ट्रांशी हातमिळवणी करून भारतीय संघर्षाचा मोठा लढा आझाद हिंद सेनेच्या नेतृत्वात उभा केला. तेव्हाच १५ ऑगस्ट १९४७ ला स्वतंत्र भारत उदयास आला. कारण इंग्रजांना देशातून पळवून लावण्यात आझाद हिंद सेनेचा मोठा वाटा आहे. आझाद हिंद सेनेची स्थापना पहिल्यांदा २९ आक्टोंबर १९१५ ला राजा महेंद्र प्रताप सिगं यांनी केली. त्यावेळी आझाद हिंद सरकारची सेना म्हणून ओळखली जायची.यांचा उद्देश भारताला इंग्रजांपासुन स्वतंत्र करने.जेव्हा दक्षिण-पूर्वी एशियामध्ये जापानच्या सहयोगाने नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी ४० हजार भारतीय स्त्री-पुरूषांना प्रशिक्षीत करून सेनेत सहभागी केले त्याला सुद्धा आझाद हिंद फौज असे नाव देण्यात



आल्यानंतर सुभाषचंद्र बोस यांना आझाद हिंद सेनेचा सर्वोच्च कमाण्डर नियुक्त केल्यानंतर आझाद हिंद सेनेची संपूर्ण कमान नेताजी सुभाषचंद्र बोस यांना सोपविण्यात आली आणि सुभाषचंद्र बोस यांचा क्रांतीकारी लढा सुरू झाला. नेताजी १९३३ पासून १९३६ पर्यंत युरोपमध्ये रहाले.तो काळ जर्मनच्या हिटलरचा नाझीवाद आणि इटलीचे नेते मुसोलिनीचा फासीस्टवाद असा होता.यांनी भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात सर्वतोपरी मदत करण्याचे वचन दिले. कारण या दोघांच्या निशाण्यावर इंग्लंड हाच देश होता. कारण इंग्लंडचे जगाच्या ७५ टक्के देशावर अधिपत्य होते. त्यामुळे इंग्लंडचा जगावर अतीरेक वाढत होता. कारण इंग्लंडने पहिल्या विश्व युध्दानंतर जर्मनीवर एकतर्फी करार लादण्यात आले होते.त्याचाच बदला जर्मनी इंग्लंड कडून घेणार होता. भारतावरसुध्दा इंग्रजांचे राज्य होते.त्यामुळे याच संधीचा फायदा घेण्याचे नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी मनात ठानले व नेताजींनी हिटलर व मुसोलिनी यांच्याशी हातमिळवणी केली. १९४३ मध्ये त्यांनी जर्मनीला सोडून ते जापानला जाऊन पोहोचले. जापानचे प्रधानमंत्री जनरल हिदेकी तोजो यांनी त्यांना सर्वोतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले. जापानमधून सिंगापूरला गेले.वयोवृध्द क्रांतीकारी रासबिहारी बोस ह्यांनी सिंगापूर येथील फेरर पार्कमध्ये भारतीय स्वातंत्र्य परिषदेचे नेतृत्व सुभाषबाबूंकडे सोपवीले.त्याचप्रमाणे सिंगापूर इथे कॅप्टन मोहन सिंग व्दारा स्थापित आझाद हिंद सेनेचीकमान आपल्या हाती घेतली.भारताला स्वतंत्र करण्यासाठी आझाद हिंद सरकारची स्थापना केली.तसेच आझाद हिंद सेना गठीत केली.या संघाचे प्रतीक चिन्ह असलेल्या झेंड्यावर डरकाळी मारणाऱ्या वाघाचे चित्र होते.कारण नेताजींची संपूर्ण कार्यशैली वाघासारखीच होती. आझाद हिंद सेनेने १८ मार्च १९४४ रोजी भारतभूमीत प्रवेश केला व माऊडॉक येथे त्यांनी भारताचा तिरंगा फडकावला. नेताजी ४ जुलै १९४४ ला बर्मा पोहचले. तेथुनच त्यांनी भारतीयांसाठी नारा दिला तुम मुझे खून दो मैं तुम्हे आझादी दुंगा.१९३९ ला गांधी विचारधारेला हरवुन नेताजींची काँग्रेसचे अध्यक्ष म्हणून नियुक्ती झाली.यावर महात्मा गांधी म्हणाले की सुभाषचंद्र बोस यांचा विजय व माझा पराजय आहे.गांधीजींच्या या वक्तव्याने व विचारांमुळे सुभाषचंद्र बोस यांचे मन दुःखावले व स्वतःहुन काँग्रेस सोडली. कारण महात्मा गांधी मवाळवादी तर सुभाषचंद्र बोस जहालवादी विचारांचे होते.परंतु दोघांचाही लढा भारत स्वातंत्र्यासाठीच होता.१९४४ मध्ये अमेरिकन पत्रकार लुई फिशर ह्यांच्याशी चर्चा करतांना महात्मा गांधींनी नेताजींना देशभक्तांचा देशभक्त असा उल्लेख केला होता. तर ४ जुन १९४४ ला सिंगापूरवरून एक संदेश देतांना सुभाषचंद्र बोस यांनी महात्मा गांधी यांना राष्ट्रपिता महात्मा गांधी म्हणुन संबोधले तेव्हा पासून महात्मा गांधींना राष्ट्रपिता संबोधल्या जावु लागले. त्यामुळे महात्मा गांधींनी अहिंसेचा मार्ग अवलंबला तर नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी क्रांतीकारीचा मार्ग अवलंबला. दोघांचाही लढा भारत स्वातंत्र्यासाठीच होता. त्यामुळेच १५ ऑगस्ट१९४७ ला भारत स्वतंत्र झाला.१८ ऑगस्ट १९४५ ला भारतासाठी दुःखद समाचार आला नेताजी सुभाषचंद्र बोस टोकियोला जातांना तैवान येथील तैहोको जवळ हवाई दुर्घटने दरम्यान नेताजींचा मृत्यू झाला व त्यांचे स्वप्न अधुरे रहाले. त्यांच्या निधनाने संपूर्ण देश स्तब्ध झाला. परंतु त्यांचे मृत शरीर अजुनही मिळाले नाही. म्हणुनच नेताजींच्या मृत्युच्या कारणांवर आज देखील विवाद सुरू असल्याचे दिसून येते.आजच्या राजकीय पुढाऱ्यांनी आपली वाममार्गाने कमवीलेली संपूर्ण धनसंपत्ती देशहितासाठी स्वखुशीने खर्च केली तर ही खरी देशभक्ती ठरेल व नेताजींना खरी आदरांजली समजल्या जाईल.आजच्या युवा पिढीमध्ये नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे आचार-विचार जागृत होने गरजेचे आहे.कारण देश निर्माण,देशाची प्रगती,देशाचा विकास नेताजींच्या विचारांनीच जलदगतीने पुढे जावु शकतात.त्याच बरोबर मी देशवासियांना आग्रह करेल की नेताजींच्या१२९ व्या जयंतीचे औचित्य साधून प्रत्येकांनी एकतरी वृक्ष लावावेत व देशात १२९ कोटी वृक्ष एकाच दिवशी लावण्याचा संकल्प सरकारनी, संघटनांनी व जनतेनी घ्यावा.यामुळे संपूर्ण भारत निसर्ग रम्य होवून प्रदूषणावर मात करण्यात आपण यशस्वी होवू.सुभाषचंद्र बोस यांच्या १२९ व्या जयंती निमित्त कोटी कोटी प्रणाम!जय हिंद!

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार )**
**मो.नं.९९२१६९०७७९,नागपूर**

# ‘स्क्रोलिंग’ थांबलं, इतिहास जागा झाला!

गाणं, डॉक्युमेंटरी आणि डिजिटल युगातील संस्कार क्रांती

सध्याच्या 'फास्ट फूड', 'इन्स्टा रिल्स'च्या युगात एखादा ट्रेंड किती काळ टिकतो ? फार तर २४ तास! पण, याच डिजिटल जगात ४०० वर्षे जुन्या इतिहासाने आजच्या 'जनरेशन झी'ला (ऋशप न) चक्क थांबायला भाग पाडले. निमित्त, सुप्रसिद्ध सुफी गायक डॉ. सतींदर सरताज यांच्या आवाजातील 'हिंद की चादर' या कलाकृतीचे.

नांदेडच्या पवित्र मातीत श्री गुरु तेग बहादुर साहिब जी यांचा ३५० व्या भव्य शहीदी समागम वर्षानिमित्त कार्यक्रम होत आहे. महाराष्ट्र शासन आणि श्री गुरू तेग बहादूरजी यांच्या ३५० व्या शहीदी शताब्दी समितीच्या सहकार्याने निर्वैर निर्मित 'हिंद की चादर' डॉक्युमेंटरी (माहितीपट), अन् सरताज यांचे गीत आता केवळ व्हायरल कंटेंट उरला नसून, ती एक 'संस्कारांची डिजिटल Midi' बनली आहे.

सुरांचा जादूगर : कोण आहेत सतींदर सरताज ?

या चळवळीचा चेहरा आणि आवाज आहेत, डॉ. सतींदर सरताज. मूळचे पंजाबचे. सरताज केवळ गायक नाहीत, तर सुफी संगीतातील 'डॉक्टरेट' (झह.ऊ) आहेत. त्यांच्या गळ्यातून जेव्हा सीस लेकर उसी ओर चल दिए... हे शब्द उमटतात, तेव्हा त्यात केवळ संगीत नसते, तर १७ व्या शतकातील वेदना आणि त्यागाचा हुंकार असतो. त्यांच्या याच भारदस्त आवाजामुळे तरुणाई पॉप गाणी सोडून इतिहासाकडे वळली आहे.

व्हायरल 'सत्य': अल्गोरिदमलाही फुटल्या भावना!

आकडेवारीवर नजर टाकली तर थक्क व्हायला होते. २५ ऑक्टोबर २०२५ ला प्रदर्शित झालेल्या 'हिंद की चादर' या गाण्याने युट्युबवर अल्पावधीतच २.७६ कोटी (२.७६ ऊीश+) व्ह्यूजचा टप्पा ओलांडला आहे. तर १.८३ लाखांहून अधिक लाईक्स असे सिद्ध करतात, की हे गीत लोकांनी फक्त ऐकले नाही, तर अनुभवले आहे.

केवळ युट्युबच नाही, तर इन्स्टाग्रामवरही (खर्पीरसीरा) या गाण्याची लाट आली आहे. विशेषतः सीस लेकर उसी ओर चल दिए या ओळींवर तरुणाईने बनवलेले हजारो 'रिल्स' (ठशशश्री) सध्या सोशल मीडियावर इमोशनल ट्रेंड बनले आहेत.

दुसरीकडे, निर्वैर प्रॉडक्शन (छळींीरळी झीर्वीलींळेपी) निर्मित १६ मिनिटांच्या डॉक्युमेंटरीला मिळालेले ४६ लाख (४६ डरज्ञही+) व्ह्यूज हे सांगण्यासाठी पुरेसे आहेत की, चांगल्या कंटेंटला 'अल्गोरिदम'ची गरज नसते, त्याला 'भावनांचा' आधार असतो.

पुस्तकातील धडा 'मोठ्या पडद्यावर'

शाळांमध्ये इतिहास शिकवला जातो, पण तो पडद्यावर 'दाखवला' तर ? महाराष्ट्र शासनाने नेमका हाच धागा पकडला आहे. शाळा, महाविद्यालयांमध्ये एक आगळावेगळा राबवत श्री गुरु तेग बहादुर साहिब जी (गुरूजी) यांच्या जीवन,शिक्षण आणि सर्वोच्च बलिदानावर आधारित माहितीपट दाखवण्यात येत आहे. या माहितीपटात तत्रज्ञ आणि निमेशनचा वापर करून जुन्या काळातील 'सेपिया' आणि 'गोल्डन' टोन उभा केला आहे.

राज्यातील शाळांमधून गुरुजींचा इतिहास विद्यार्थी मोठ्या पडद्यावर पाहत आहेत. या इतिहासातून ते प्रेरणा घेत आहेत. इतिहास समजून घेत आहेत. जेव्हा विद्यार्थी पडद्यावर पाहतात, की गुरुजींच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यासाठी भाई लखी शाह बंजारा चक्क स्वतःचे घर जाळून टाकतात, तेव्हा वर्गातली शांतता खूप काही सांगून जाते. जे संस्कार शंभर व्याख्यानांतून करणे अवघड आहे, ते या माहितीपटातून होण्यास मदत होते.

महानायकांना सलाम,हा माहितीपट, गीत इतिहास जिवंत करते. अशा महानायकांना सलाम करते. हा सर्व इतिहास पुस्तकातून आता थेट लोकांच्या काळजात कोरल्या जात आहे.

भाई मख्खन शाह लबाना : ज्यांनी समुद्राच्या तुफानातून वाचल्यावर 'खऱ्या गुरूंचा' शोध लावला.

भाई लखी शाह बंजारा: दिल्लीच्या चांदनी चौकात मुघलांच्या नाकावर टिच्चून ज्यांनी घरदार जळाले तरी चालेल, पण गुरुजींची शान राहिली पाहिजे, हा बाणा जपला

भाई जैता जी : गुरुजींचे पवित्र शीर (मस्तक) सांभाळून, अतिशय कठीण प्रवासाने आनंदपूर साहिबला आणले व गुरू तेगबहादुर जी यांचे पुत्र गुरू गोविंदसिंह जी यांच्याकडे सुपूर्द केले.

नांदेड : विश्वासाचे केंद्रया साऱ्याचा केंद्रबिंदू आहेनांदेड. गोदावरीच्या काठावर वसलेले शहर. हे केवळ शहर नसून एक मोठे पवित्र तीर्थस्थान आहे. हे पवित्र स्थळ शीख धर्मातील पाच तख्तांपैकी एक आहे. येथे हजूर साहिब गुरूद्वारा, ज्याला तखत सचखंड श्री हजूर अबचलनगर साहिब म्हणून ओळखले जाते. दहावे गुरू गुरू गोविंद सिंह यांचे अंतिम विश्रांतीस्थान आहे. श्री गुरू गोविंद सिंहांचे वास्तव्य या भूमीस लाभले. त्याचबरोबर गुरू गोविंद सिंहांनी त्यांच्यानंतर पवित्र ग्रंथालाच शाश्वत गुरू म्हणून घोषित केले. शीख धर्माचे अकरावे आणि अंतिम गुरू पवित्र गुरू ग्रंथ साहिब याच ठिकाणी आहेत. त्यामुळे या पवित्र भूमीत होत असलेल्या श्री गुरू तेग बहादूर साहिब जी ३५० शहीदी आणि श्री गोविंद साहिब जी ३५० व्या गुरतागद्दी शताब्दी निमित्ताने आयोजित कार्यक्रमाकडे संपूर्ण जग पाहत आहे.

शाळेतील मुलांच्या प्रभात फेऱ्या असोत किंवा राज्यातील सिनेमागृहात चित्रपटाच्या सुरूवातीला दाखवले जाणारे गुरूजींच्या जीवनावर आधारित गीत, माहितीपट असो; प्रत्येक ठिकाणाहून गुरूजींचे जीवन, शिकवण आणि त्यांचे सर्वोच्च बलिदान हा संदेश दिला जात आहे. सरताज यांनी गायलेले गीत, गुरूजींवर आधारित माहितीपट ३५० वर्षांपूर्वीच्या प्रेरक इतिहासाचा आजच्या भाषेतला 'दस्तावेज' (ऊेलीशपीं) आहे. औरंगजेबाच्या तलवारीपेक्षा गुरुजींचा शांततेचा आणि त्यागाचा मार्ग किती शक्तिशाली होता, हे समजून घेण्यासाठी एकदा तरी ही कलाकृती सर्वांनी पाहायलाच हवी !

गुरू तेग बहादुर साहिब जी यांच्या शहीदीला ३५० वर्ष पूर्ण होत असल्याच्या निमित्ताने भारतभर मोठ्या प्रमाणात कार्यक्रम होताहेत. परंतु नांदेड येथे होत असलेल्या या कार्यक्रमास विशेष असे महत्त्व आहे. या होत असलेल्या भव्य दिव्य अशा या श्री गुरू तेग बहादूर साहिब जी शहीदी आणि श्री गोविंद साहिबजी ३५० व्या गुरतागद्दी शताब्दी कार्यक्रमास उपस्थित राहून, प्रत्येकाने इतिहासाचे साक्षीदार देखील व्हायलाच हवे.

**डॉ. श्याम टरके**
**सहायक संचालक (माहिती),**
**विभागीय माहिती कार्यालय,**
**लातूर**

# मेघराज सावळकर यांचा सत्कार

लातूर- शहर युवक काँग्रेसच्या सचिव पदी लातूरच्या



जुन्या गावभागातील सक्रिय सामाजिक युवा कार्यकर्ते मेघराज नारायण सावळकर यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा ककय्या समाजाच्या वतीने समस्त ककय्या समाज महासंघाचे जिल्हाध्यक्ष श्रीमंत कावळे , जिल्हा सचिव मैलारीराज कावळे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला, माजी मंत्री आमदार अमित देशमुख, युवा अध्यक्ष विष्णूदास धायगुडे यांच्या हस्ते निवड पत्र देऊन त्यांची निवड करण्यात आली आहे, यावेळी बहुजन शिक्षक महासंघाचे जिल्हा उपाध्यक्ष संभाजी गुळवे, समस्त ककय्या महासंघाचे राज्यसचिव गणेश सावळकर, युवा नेते धर्मराज सावळकर,ऋषिकेश सावळे,विशेष शिक्षक बालाजी सावळकर,ऋग्वेद सावळकर,इ. मान्यवर उपस्थित होते या निवडीबद्दल अँड. गोपाळ बुरबुरे,मा.सभापती पंडित कावळे यांनी अभिनंदन केले आहे

# बनसारोळा येथील ग्रामरोजगार सेवकास उपसरपंचपती व मुलांकडून मारहाण!

केज/प्रतिनिधी-बनसारोळा ग्रामपंचायतचे ग्रामरोजगार सहाय्यक यांना ग्रामसभेत मारहाण केल्याप्रकरणी सरपंचासह उपसरपंच पती व त्यांच्या मुलावर शासकीय कामकाजामध्ये अडथळा निर्माण केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात यावा अशी लेखी निवेदनाद्वारे मागणी महाराष्ट्र राज्य ग्रामरोजगार सेवक कर्मचारी संघटनेच्या वतीने गट विकास अधिकारी यांच्याकडे करण्यात आली आहे.



याबाबतची सविस्तर माहिती अशी की, ग्रामपंचायत कार्यालय बनसारोळा येथील ग्राम रोजगार सहाय्यक गोविंद सोपान गोरे यांना शासनाने नेमून दिलेले ग्रामसभेमध्ये दिनांक १४ जानेवारी २०२६ रोजी सरपंच यांच्या सांगण्यावरून उपसरपंच यांचे पती व मुलगा यांनी भर ग्रामसभेमध्ये मारहाण केली असून सदरची महाराण ही घरपट्टी, नळपट्टी वसुली करण्यासाठी सरपंच यांच्या तोंडी सांगण्यावरून व ग्रामपंचायत कार्यालयाचे यांच्याकडून रजिस्टर नावाप्रमाणे मस्टर कालावधी दिनांक २ जानेवारी २०२६ ते ७ जानेवारी २०२६ पर्यंतचे काढलेल्या मस्टरची यादीत उपसरपंच यांच्या मुलाचे नाव हे बाकी मध्ये आलेले असून सरपंच यांच्या सांगण्यावरून जय यांचे बिल बाकी आहे. त्यांच्या मस्टरवर सह्या करतो व जयंती बाकी आहे. त्यांना सरपंच यांच्या सांगण्यावरून रोजगार सहाय्यक यांनी फोन केले असता सदरील काम घरपट्टी व नळपट्टी वसुलीचे हे ग्रामपंचायतचे क्लार्क/ लिपिक यांचे असून रोजगार सहाय्यक यांचे घरकुल, जलसिंचन विहीर या लाभार्थ्यांचे मस्टर काढणे आहे. सदरील सरपंच यांच्या सांगण्यावरून ग्रामरोजगार सहाय्यक यांना मारहाण करून त्यांच्या हातातून मोबाईल घेऊन जाणीवपूर्वक मोबाईल फोडला व जीवे मारण्याच्या धमक्या दिल्या आहेत. सरपंचावर योग्य ती कारवाई करून उपसरपंच पती व मुलगा यांच्यावर शासकीय कामकाजामध्ये अडथळा निर्माण केल्याचा गुन्हा दाखल करून ग्राम रोजगार सहाय्यक यांना न्याय देण्यात यावा. अन्यथा असेच प्रकार बाकीच्या ठिकाणी होतील व या विषयाला पायंडा पडेल म्हणून ग्राम रोजगार सहाय्यक यांना सहकार्य करण्यात यावे. असे दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

या लेखी निवेदनावर संघटनेचे केज तालुका अध्यक्ष विष्णू जाधव, उपाध्यक्ष गोविंद गोरे, सचिव अनिल घोडके, गोरख गीते, दत्तप्रसाद पुरी, शेख दादामियाँ, नवनाथ चंदनशिव यांच्यासह ४१ जणांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

लेखी निवेदनाच्या प्रती गट विकास अधिकारी पंचायत समिती केज, तहसीलदार केज, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद बीड, पोलीस ठाणे युसुफ वडगाव यांना दिल्या आहेत. यावेळी माध्यमांशी बोलताना ग्रामरोजगार सेवक कर्मचारी संघटनेचे पदाधिकारी यांनी म्हटले की, सदर प्रकरणी आमच्या सहकाऱ्यांना शासनाने तात्काळ न्याय द्यावा. सदर प्रकरणातील संबंधित दोषीवर तात्काळ कारवाई करण्यात यावी अन्यथा संघटनेच्या वतीने तीव्र व उग्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात येईल असा प्रशासनाला इशारा संघटनेने दिला आहे.

# केज-येवता रस्त्यावर भलेमोठे खड्डे ;गुत्तेदारांनो जागे व्हा रस्ता दुरुस्तीची वेळ आली अधिकाऱ्यांची चांदी झाली

केज/प्रतिनिधी-केज-येवता





रस्त्यावर भले मोठ मोठे खड्डे पडलेले आहेत. गुत्तेदारांनो जागे व्हा रस्ता दुरुस्तीची वेळ आली आहे,आता अधिकाऱ्यांची चांदी झाली असून या रस्त्याची उन्हाळ्यात दुरुस्ती आन पावसाळ्यात खड्डेच खड्डे पडलेले असतात त्यामुळे गुत्तेदार अधिकारी मालामाल होतात अशी चर्चा नागरिकांतून ऐकण्यास मिळत आहे व तसे बोलले जात आहे.मात्र या रस्त्यावरुन प्रवास करणारे नागरिक,शाळेचे व वाहन चालक त्रस्त झालेले आहेत, त्यांना या रस्त्यावरून प्रवास करताना करावी लागते तारेवरची कसरत.या रस्त्याच्या कामाकडे लोकप्रतिनिधी व प्रशासनातील अधिकारी, कर्मचारी यांचे दुर्लक्ष असल्याचे प्रवाशांतुन बोलले जात आहे.

केज तालुक्यातील प्रमुख गावाला जोडणारा केज-येवता हा रस्ता गेल्या अनेक वर्षापासून मृत्यूचा सापळा बनला आहे. गुत्तेदार व अधिकारी यांच्या संगनमताने दुरुस्ती करून लाखोंचा ऐवज जमवण्याचे काम गेल्या अनेक वर्षापासून या रस्त्यावर होत असून या रस्त्यावरून मोठी रहदारी असताना देखील लोकप्रतिनिधी मोठ्या कामांचे श्रेय घेण्यात दंग आहेत मात्र हा ग्रामीण भागातील जिव्हाळ्याचा रस्ता असताना याकडे मात्र जाणून बुजून दुर्लक्ष केले जात आहे कारण हा रस्ता लोकप्रतिनिधीचे कार्यकर्ते जगण्यासाठी त्यांचे कुरण असल्याचे नागरिकांतून बोलले जात आहे. कारण रस्ता दुरुस्ती उन्हाळ्यात केली की, लगेचच पावसाळ्यात वाहुन जाते या रस्त्याला दुरुस्ती करताना कसलेही प्रकारचे डांबर वापरले जात नाही. त्यामुळे हा रस्ता वारंवार ज्या ठिकाणी खड्डे आहेत त्याच ठिकाणी परत खड्डे दुरुस्त करूनही कसे काय पडतात? हाच प्रश्न या रस्त्यावरून ये-जा करणाऱ्यांना पडलेला आहे. यावरून असे दिसून येते की,हा रस्ता फक्त गुत्तेदारांना व अधिकाऱ्यांना जगण्यासाठी असाच ठेवायचा आहे की,काय? यावर कधी चांगले दिवस येणार असा प्रश्न या रस्त्यावर प्रवास करणाऱ्या सर्व सामान्य जनतेला पडलेला आहे.याकडे लोकप्रतिनिधी लक्ष घालतील का?हेच पाहणे आता उत्सुकतेचे ठरले. कारण लोकप्रतिनिधी नॅशनल हायवेची मंजुरीचे श्रेय घेण्यात दंग आहेत मात्र त्यांना ज्या ग्रामीण भागातील मतदारांनी मतदान केले याकडे मात्र त्यांचे दुर्लक्ष आहे असे यावरून दिसून येत आहे.

या रस्त्यावरून प्रवास करताना अनेक अपघात झालेले आहेत तर आजारी रुग्णांना रात्रीच्या वेळी तालुक्याच्या ठिकाणी उपचारासाठी आणण्यासाठी रस्ता खराब असल्याने वाहन चालक हे अनंत नाहित.या रस्त्याचा रुग्णांन सेवेवर मोठा परिणाम होत आहे.

# हिंद दी चादर गुरु तेग बहादुर यांचा ३५० वा शहीदी समागम ऐतिहासीक 'जफरनामा'ची हस्तलिखित प्रत छत्रपती संभाजीनगर येथील भाई दयासिंग, भाई धरमसिंग गुरुद्वाऱ्यात संग्रहित

छत्रपती संभाजीनगर,(जिमाका)- सामाजिक एकोपा, धर्म रक्षणासाठी शहादत देणाऱ्या गुरु तेग बहादुरांना हिंद दी चादर अशी पदवी आहे. त्यांचे जीवन हे समाजाच्या रक्षणासाठी वाहिले. तत्कालीन शास्त्यांकडून समाजावर होत असलेल्या अन्यायपूर्ण वागणुकीचा सामोपचार ज्या पत्राने झाला ते पत्र 'जफरनामा' म्हणून इतिहासात प्रसिद्ध आहे. हाच जफरनामा तत्कालिन मुगल बादशाह औरंगजेब यांच्याकडे देण्यासाठी म्हणून छत्रपती संभाजीनगर या शहरात आणला गेला होता. आजही त्याची हस्तलिखित प्रत येथील भाई दयासिंग, भाई हरिसिंग गुरुद्वाऱ्यात संग्रहित आहे.

एक प्रकारे मानव मुक्तीचा जाहीरनामा असलेला हा जफर नामा म्हणजे गुरु तेग बहादुर साहेब यांचे सुपूत्र गुरु गोविंद सिंग यांनी मुगल बादशाह औरंगजेबाला लिहिलेले एक पत्र होय.

नांदेड येथे येत्या २४ व २५ जानेवारी रोजी होऊ घातलेल्या हिंद दी चादर गुरु तेग बहादुर यांच्या ३५० व्या शहीदी समागम कार्यक्रमाचे आयोजन होत आहे. देश विदेशातील भाविक याठिकाणी येणार आहे. त्याअनुषंगाने गुरु तेग बहादुर यांच्या कार्याला उजाळा दिला जात आहे.

याबाबत भाई दयासिंग, भाई हरिसिंग गुरुद्वाराचे सदस्य सरदार हरिसिंग यांनी माहिती दिली. त्यानुसार, 'जफर नामा' म्हणजे विजयाचे पत्र. मुगल बादशाह औरंगजेब याने शिखांवर अनन्वित अत्याचार केले. त्याविरोधात हे एक प्राणांतिक आंदोलन होते. जिझिया करा द्वारे अन्य धर्मियांचे कर रुपात शोषण होत होते. त्यास प्रतिकार करणाऱ्यांना प्राणांची आहुती द्यावी लागे. त्यासाठी गुरु तेग बहादुर यांनी आपल्या शिष्यांसह शहादत दिली. तो एक मोठा रोमांचक इतिहास आहे. शिखांची बलिदानाची परंपरा अधोरेखित



करणारी ही घटना होय.

त्याच गुरु तेग बहादुर यांचे पुत्र गुरु गोविंदसिंह यांनी याबाबत औरंगजेबाला पत्र लिहिले. हे पत्र जफरनामा म्हणून प्रसिद्ध आहे. या पत्राचे महत्त्व खूप आहे. हेच ते पत्र जे औरंगजेबाच्या कृत्यांची श्वेत पत्रिका म्हणूनही ओळखले जाते. हे पत्र वाचून औरंगजेबाला आपल्या कृत्याचा पश्चाताप झाला. त्याचे हृदय परिवर्तन झाले. त्यानंतर त्याने अन्याय अत्याचाराला चालना देणारे कायदे रद्द करण्याचे फर्मान जारी केले. या शिवाय गुरु गोविंदसिंगांना पकडण्याचा कुणीही प्रयत्न करु नये. त्यांना त्रास देऊ नये त्यांना सहाय्य करावे, असेही हुकूम जारी केले. इतकेच नव्हे तर त्याने गुरु गोविंदसिंग यांना भेटण्याची इच्छाही व्यक्त केली. मात्र ही त्याची इच्छा काही पूर्ण होऊ शकली नाही. कारण ही घटना इ.स. १७०७ मधिल आहे. हेच वर्ष औरंगजेबाच्या आयुष्याचे शेवटचे वर्ष ठरले.

जफरनामा आणि छत्रपती संभाजीनगरचे अत्यंत महत्त्वाचा संबंध आहे. हे पत्र गुरु गोविंदसिंगांनी लिहिल्यानंतर ते औरंगजेब पर्यंत पोहोचवायचे होते. त्यावेळी औरंगजेब मराठा साम्राज्याचा बिमोड करण्याच्या इच्छेने महाराष्ट्रात तळ ठोकून बसला होता. गुरु गोविंद सिंग यांचे दोन शिष्य भाई दयासिंग आणि भाई धरमसिंग हे पत्र घेऊन औरंगजेबाचे दक्षिणेतील महत्त्वाचे शहर म्हणून छत्रपती संभाजीनगरला (त्यावेळचे औरंगाबाद) आले. येथे येऊन त्यांनी मुगल बादशाहच्या भेटीचा प्रयत्न केला. नेमका त्यावेळी औरंगजेब बादशाह अहिल्यानगर (त्यावेळचे अहमदनगर) मुक्कामी होता. या दोघां शिष्यांनी इथूनच अहमदनगरकडे कूच केले. औरंगजेबाला भेटून आपल्या गुरुंचे पत्र सुपूर्द केले.

फार्सी भाषेत व लिपीत हे पत्र छंदबद्ध काव्य पद्धतीने लिहिले आहे. त्यात शिखांवर झालेल्या अन्याय, अत्याचाराचे वर्णन आहे आणि काहीही झाले तरी आम्ही अन्याय सहन करणार नाही असा निर्धारही आहे. एखाद्या संताने राज्यकर्त्याला खडे बोल सुनावले आहेत. हे पत्र अर्थात जफरनामा औरंगजेबाने वाचला. वाचून त्याला केलेल्या कृत्याचा पश्चाताप झाला. आपल्या आयुष्याच्या अखेरीची चाहूल त्याला लागली होती. त्याने तात्काळ फर्मान जारी करुन सर्व अत्याचार थांबविण्याचे आदेश दिले.

हे पत्र शीख धर्माच्या पवित्र अशा दशमग्रंथ या ग्रंथात समाविष्ट करण्यात आले आहे. आजही छत्रपती संभाजीनगरच्या धावणी मोहल्ला, शहागंज येथील भाई दयासिंग, भाई धरमसिंग या गुरुद्वाऱ्यात संग्रहित ठेवण्यात आले आहे. हे पत्र आजही पाहता येते. विशेष म्हणजे हाच गुरुद्वारा दक्षिण भारतातील पहिला गुरुद्वारा मानला जातो. देशभरातील भाविक येथे माथा टेकण्यासाठी आवर्जून येतात, अशी माहिती या गुरुद्वाराचे सदस्य सरदार हरिसिंग यांनी दिली.

# माजी सैनिक, सैनिक पत्नी व पाल्यांसाठी मेस्को सिक्युरिटीमध्ये भरती

मुंबई,दि.२१ : माजी सैनिक, वीर नारी तसेच सेवानिवृत्त व सेवेतील जवानांच्या पत्नी आणि अवलंबित पाल्यांसाठी मेस्को सिक्युरिटीकडून सुरक्षा रक्षक पदासाठी भरती प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. ही भरती कंत्राटी सेवा पद्धतीवर असून, उमेदवारांना त्यांच्या राहत्या घरापासून १० ते १५ किलोमीटर अंतरावर कामाचे ठिकाण देण्यात येणार आहे अशी माहिती मुंबई शहरचे जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे दिली आहे.

कंत्राटी सेवा पद्धतीवर सुरक्षा रक्षक भरण्यात येणार आहे. या पदासाठी दररोज ८ तास काम, आठवड्यातून १ साप्ताहिक सुट्टी, पीएफ ईएसआय अंतर्गत जीवन विमा सुविधा, बोनस व ग्रॅच्युइटी या सुविधा आहेत. या पदासाठी एक्स सर्व्हिसमन, आर्मी, नेव्ही व एअर फोर्स साठी ३५ ते ५८ वर्षे, सीआरपीएफ, एसआरपीएफ, बीएसएफ, सीआयएसएफ, आयटीबीपी, होमगार्ड यासाठी ३५ ते ५५ वर्षे वयोमर्यादा, माजी सैनिकांच्या (ईएसएम) वीर नारी : १८ ते ४५ वर्षे, माजी सैनिकांच्या (ईएसएम) वीर पत्नी १८ ते ४५ वर्षे, माजी सैनिकांच्या (ईएसएम) वीर पाल्य ईएसएम पाल्य : २१ ते ३५ वर्षे ही वयोमर्यादा आहे.

या पदासाठी आवश्यक कागदपत्रे आधार कार्ड,पॅन कार्ड, बँक पासबुक (स्वतः चे व वारसाचे), डिस्चार्ज बुक, पीपीओ, एक्स सर्व्हिसमन आयडी (सेवानिवृत्त जवानांसाठी), मेस्को कोर्स सर्टिफिकेट (वीर नारी, सेवानिवृत्त व सेवेतील जवानांच्या पत्नी व पाल्यांसाठी) मेस्को सिक्युरिटीद्वारे राबविण्यात येणारी ही भरती प्रक्रिया माजी सैनिक व त्यांच्या कुटुंबीयांसाठी आर्थिक स्थैर्य आणि सुरक्षित भविष्याची दिशा देणारी ठरणार आहे. इच्छुक व पात्र उमेदवारांनी तात्काळ संपर्क साधण्याचे आवाहन मुंबई शहर जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी केले आहे.

संपर्कासाठी क्रमांक:- क्षेत्रीय व्यवस्थापक (९९९०३१२३१२), सुरक्षा अधिकारी (७४२०००२८३१) कार्यालयीन दूरध्वनी (९४६६८१९८८७)

# प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता देण्याच्या प्रक्रियेत सुसूत्रता आणावी मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे

मुंबई, : राज्यातील १५ कोटी रुपयांपर्यंतच्या विकास प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता देण्याच्या प्रक्रियेत अधिक सुसूत्रता आणि गती आणावी, असे निर्देश मत्स्यव्यवसाय आणि बंदरे मंत्री नितेश राणे यांनी मंत्रालयात आयोजित बैठकीत दिले.

वित्त विभागाच्या २० सप्टेंबर २०१९ च्या शासन निर्णयानुसार (ऋठ) विहित करण्यात आलेल्या कार्यपद्धतीचा बैठकीत सविस्तर आढावा घेण्यात आला.

प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता देताना येणारे तांत्रिक अडथळे दूर करून कामांना गती देण्याचे निर्देश देत बंदरे मंत्री राणे म्हणाले, २०१९ च्या शासन निर्णयातील तरतुदींची अंमलबजावणी




प्रभावीपणे होत आहे की नाही, याची पडताळणी करण्यात यावी. विविध विभागांमधील तांत्रिक आणि प्रशासकीय समन्वय वाढविण्यात यावा. याद्वारे १५ कोटींपर्यंतच्या लहान व मध्यम स्वरूपाच्या प्रकल्पांना मंजुरी मिळण्याचा मार्ग अधिक सुकर होऊन विकासकामांना वेग मिळेल, असेही बंदरे मंत्री राणे यांनी सांगितले.

बैठकीस वित्त विभागाचे अप्पर मुख्य सचिव विवेक दहिफळे, उपसचिव ठाकूर, महाराष्ट्र सागरी मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी श पी. प्रदीप यांच्यासह संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# भाजपाचे युवा नेते ऋषिकेश कराड यांच्यासह अनेकांचे जि.प.,पं.स. निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल

लातूर – भारतीय जनता युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष ऋषिकेशदादा रमेशआप्पा कराड यांनी रेणापूर तालुक्यातील पानगाव जिल्हा परिषद गटातून भारतीय जनता पार्टीच्या वतीने मोठ्या उत्साहाच्या वातावरणात उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी कामखेडा गटातून सौ. सरिता शंकरराव भिसे, खरोळा गटातून सौ. शिवकन्या महेंद्र गोडभरले आणि पोहरेगाव गटातून सौ. मनीषा दशरथ सरवदे यांच्यासह पंचायत समिती गणातील उमेदवारांनी बुधवार २१ जानेवारी रोजी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले. यावेळी भाजपाचे पदाधिकारी, लोकप्रतिनिधी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



लातूर जिल्हा परिषद आणि रेणापूर पंचायत समितीसाठी येत्या ५ फेब्रुवारी रोजी रोजी मतदान होणार असून भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पार्टीच्या वतीने पानगाव जिल्हा परिषद गटातून युवा नेते ऋषिकेशदादा कराड, पानगाव पंस गणातून सौ. रंजना मारुती गालफाडे, कोष्टगाव पंस गणातून सौ. जयश्री संजय डोंगरे; कामखेडा जिप गटातून सौ. सरिताबाई शंकरराव भिसे, कामखेडा पंस गणातून शरद देरेकर, मोटेगाव पंस गणातून संतोष चव्हाण; खरोळा जिल्हा परिषद गटातून सौ. शिवकन्या महेंद्र गोडभरले, खरोळा पंस गणातून सौ. शितल प्रताप राऊतराव, कारेपूर पंस गणातून सौ. अंजली राजेश काळे आणि पोहरेगाव जिल्हा परिषद गटातून सौ. मनीषा दशरथ सरवदे, पोहरेगाव पंस गणातून आकाश भुतके, निवाडा पंस गणातून विष्णू गोरे यांनी आपले उमेदवारी अर्ज रेणापूर येथील तहसील कार्यालयात दाखल केले.

यावेळी माजी आमदार ॲड. त्र्यंबकनाना भिसे, ज्येष्ठ नेते ओमप्रकाश गोडभरले, राजेश कराड, व्यंकटराव अनामेमामा, शंकरराव भिसे, अनंत चव्हाण, नवनाथ भोसले, अनिल भिसे, सतीश आंबेकर, सुकेश भंडारे, दशरथ सरवदे, महेंद्र गोडभरले, अभिषेक आकनगिरे, विजय गंभीरे, ॲड. मनोज कराड, सुनील चेवले, रवींद्र नागरगोजे, नामदेव बोंबडे, विष्णू गोरे, राम मोरे, तेजस कराड, श्रीकृष्ण मोटेगावकर, विजय चव्हाण, श्रीकृष्ण जाधव, रवींद्र नागरगोजे, लक्ष्मण यादव, दिगंबर येडले, भागवत गीते, सुंदर घुले, माधव घुले, महादेव जाधव, नारायण राठोड, दत्ता सरवदे, निवृत्ती लहाने, अच्युत कातळे, महेश गाडे, मारूफ आत्तार, वैजनाथ लहाने, राजकुमार आलापुरे, उत्तम चव्हाण, गोविंद देशमुख, गुणवंत जोगदंड, नानासाहेब कस्पटे, श्रीकृष्ण पवार, शिवाजी जाधव, संपत कराड, संजय केंद्रे, नवनाथ माने, प्रकाश केदार, बालाजी केंद्रे, अभिजीत मद्दे, दिलीप पाटील, राम भताने, नरेश चपटे, सुधाकर काळे, रमाकांत फुलारी, बालासाहेब शेप, कुलभूषण संपत्ते, मेघराज जाधव, रमेश पारिख, रमेश केंद्रे, मच्छिंद्र चक्रे, मदन दहिफळे, लक्ष्मण खलंग्रे, दत्तात्रेय कस्तुरे, नाथराव गीते, दत्तात्रेय मुंडे, राम बडे, मारुती गालफाडे, धम्मानंद घोडके, श्रीमंत नागरगोजे, नरसिंग येलगटे, विठ्ठल डोंगरे, रानबा मुळे, संजय डोंगरे, मच्छिंद्र चक्रे, नंदकुमार वल्लमपल्ले, संतोष राठोड, योगेश राठोड, रमा चव्हाण, विकास सरवदे, बसवराज गुरफळे, प्रकाश जाधव, वैजनाथ कांदे यांच्यासह भारतीय जनता पार्टीचे लोकप्रतिनिधी पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिदोड येथील श्री महालक्ष्मी विद्यालयात ‘आनंद नगरी’ व ’हळदी-कुंकू’ कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न

बीड/प्रतिनिधी–बीड शहरापासून जवळ असलेल्या शिदोड येथील शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळ, बीड संचलित श्री महालक्ष्मी माध्यमिक विद्यालयात आनंद नगरी व हळदी–कुंकू कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला.




आनंद नगरीचे उद्घाटन जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक श्री. राजेश पवार यांच्या हस्ते झाले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक दत्तात्रय चव्हाण सर होते. व्यासपीठावर वस्ती शाळेच्या मुख्याध्यापिका वरपे मॅडम, गावातील प्रतिष्ठित नागरिक सोलनकर, संजय मस्के, दिलीप जोगदंड, अशोक सातपुते, चिल्लेवाड सर, टेकाळे मॅडम, वाव्हळ सर, साळुंके मॅडम, सानप मॅडम, गुजर सर आदी मान्यवर उपस्थित होते.

शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये व्यावसायिक कौशल्य, स्वावलंबन, कष्टाळूपणा, चिकाटी यांसारखे गुण रुजावेत तसेच त्यांना स्वतः च्या क्षमतेचे प्रदर्शन करण्याची संधी मिळावी, या उद्देशाने दरवर्षी प्रमाणे या आनंद नगरी या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात इयत्ता ८ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत आपल्यातील सुप्त गुणांचे दर्शन घडवले. ‘विद्येचे मंदिर, आनंदाचे केंद्र’ या संकल्पनेनुसार शाळेच्या प्रांगणात विद्यार्थ्यांनी विविध स्टॉल्स उभारले होते. खाऊची दुकाने, खेळणी, भाजीपाला, आईस्क्रीम, विविध खेळ तसेच विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेल्या वस्तू व शैक्षणिक साहित्याची विक्री करण्यात आली. विद्यार्थ्यांनी मांडलेल्या या स्टॉलवरून मनसोक्त खरेदीसाठी पालक व ग्रामस्थांनी मोठी गर्दी केल्याने विद्यार्थ्यांचा उत्साह द्विगुणित झाला होता. या आनंद नगरीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना व्यवहारज्ञानाचे प्रत्यक्ष धडे मिळाले. या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासात लक्षणीय वाढ होत असल्याची भावना उपस्थित पालकांनी व्यक्त केली. विद्यार्थ्यांनी स्वतः केलेल्या कमाईचा आनंद त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्टपणे दिसत होता.

याच वेळी आयोजित माता–पालक हळदी–कुंकू कार्यक्रमास शिदोड गावातील माता–भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. तसेच गावकरी, प्रतिष्ठित नागरिक, आजी–माजी विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व पालकांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम यशस्वीरीत्या संपन्न झाला. राष्ट्रगीताने या आनंददायी मेळाव्याची सांगता करण्यात आली.

# संसदीय पारदर्शकतेचा नवा आधारस्तंभ म्हणजे तंत्रज्ञान- अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर

लखनौ, उत्तर प्रदेश : विधिमंडळाच्या कार्यपद्धतीत पारदर्शकता, कार्यक्षमता आणि नागरिककेंद्री दृष्टिकोन अधिक मजबूत करण्यासाठी तंत्रज्ञान हे निर्णायक साधन ठरत आहे,असे मत महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष ड राहुल नार्वेकर यांनी व्यक्त केले. ते लखनौ येथे आयोजित ८६व्या अखिल भारतीय पीठासीन अधिकारी परिषदेत (एआयपीओसी) बोलत होते.

‘पारदर्शक, कार्यक्षम आणि नागरिक–केंद्री विधिमंडळ प्रक्रिया घडविण्यासाठी तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर’ या विषयावर अध्यक्ष नार्वेकर म्हणाले की, संसदीय लोकशाही आज अशा टप्प्यावर उभी आहे जिथे दीर्घकालीन परंपरा आणि भविष्याभिमुख प्रशासन यांचा समन्वय साधणे अत्यावश्यक आहे. डिजिटल परिवर्तन म्हणजे केवळ यांत्रिकीकरण नव्हे, तर लोकांचा विश्वास पुनर्स्थापित करण्याची आणि नागरिक व विधिमंडळ यांच्यातील नाते अधिक दृढ करण्याची प्रक्रिया आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला, राज्यसभेचे उप सभापती हरिवंश, उत्तर प्रदेश विधानसभेचे अध्यक्ष सतीश महाना, महाराष्ट्र विधान परिषदेचे सभापती प्रा राम शिंदे तसेच देशभरातील विविध विधिमंडळांचे पीठासीन अधिकारी उपस्थित असलेल्या या परिषदेत अध्यक्ष नार्वेकर यांनी अखिल भारतीय पीठासीन अधिकारी परिषद अर्थात एआयपीओसी ही भारताच्या लोकशाही प्रवासातील आत्मपरीक्षण आणि नवोपक्रमासाठी अत्यंत महत्त्वाचे व्यासपीठ असल्याचे नमूद केले.

डिजिटल लोकशाहीची अपरिहार्यता अध्यक्ष ड. नार्वेकर यांनी सांगितले की, डिजिटल क्रांतीमुळे शासन आणि जनतेतील अंतर लक्षणीयरीत्या कमी झाले आहे. लोकशाही ही एकतर्फी संवादाची प्रक्रिया राहू शकत नाही; ती परस्परसंवादी आणि सहभागात्मक असली पाहिजे.

लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वाचा उल्लेख करताना त्यांनी ‘डिजिटल संसद’ या संकल्पनेवर भर देत सांगितले की, तंत्रज्ञानाच्या माध्यमातून शेवटच्या घटकाचा आवाज लोकशाहीच्या सर्वोच्च मंदिरापर्यंत पोहोचला पाहिजे. एक राष्ट्र एक विधिमंडळ मंच ही संकल्पना केवळ प्रशासकीय सोय नसून, लोकशाही उत्तरदायित्वाची नैतिक बांधिलकी असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

महाराष्ट्राची डिजिटल वाटचाल : वारसा जपणारी, पारदर्शकता वाढविणारी महाराष्ट्राच्या अग्रगण्य भूमिकेवर प्रकाश टाकताना अध्यक्ष नार्वेकर म्हणाले की, महाराष्ट्र विधिमंडळ



गेल्या दोन दशकांपासून विधानपरिषदेच्या डिजिटायझेशनमध्ये देशात आघाडीवर आहे. १९३७ पासूनच्या विधानसभा कामकाजाचे स्वातंत्र्यपूर्व काळातील चर्चांसह आणि संयुक्त महाराष्ट्र स्थापनेच्या काळातील नोंदींसह संपूर्ण डिजिटायझेशन करण्यात आले असल्याची माहिती त्यांनी दिली.

या सर्व नोंदी आता अभ्यासयोग्य व सर्वसामान्य नागरिकांसाठी उपलब्ध असल्यामुळे आमदार, संशोधक, विद्यार्थी व नागरिक मोठ्या प्रमाणावर लाभान्वित होत असल्याचे त्यांनी सांगितले. इतिहासाविना विधिमंडळ म्हणजे मुळांशिवाय झाड, असे सांगत विधिमंडळाच्या स्मृती लोकशाहीकरणामुळे संस्थात्मक सातत्य बळकट होत असल्याचे त्यांनी नमूद केले.

तातडीने संदर्भ उपलब्धता पारदर्शकतेच्या दृष्टीने दृश्य माध्यमांचे महत्त्व अधोरेखित करताना अध्यक्ष नार्वेकर यांनी सांगितले की, महाराष्ट्रात २०१२ पासून सभागृहाच्या कामकाजाचे संपूर्ण ध्वनी–दृश्य चित्रण केले जात आहे. यामुळे नागरिकांना विधिमंडळाचे कामकाज प्रत्यक्ष पाहण्याची संधी मिळत असून चुकीच्या माहितीला आळा बसण्यास मदत होत आहे.

प्रश्नोत्तर कालावधी, चर्चा व विधेयकांवरील चर्चांचे तत्काळ उपलब्ध रेकॉर्ड कार्यकारी उत्तरदायित्व आणि जनजागृती वाढविण्यास उपयुक्त ठरत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

आमदार सशक्तीकरण आणि नागरिक–केंद्री शासन तंत्रज्ञानामुळे कागदावरचे अवलंबित्व कमी होऊन विधिमंडळाचे काम अधिक सुलभ व कार्यक्षम होत असल्याचे अध्यक्ष नार्वेकर यांनी नमूद केले. दुर्गम व आदिवासी भागातील आमदारांनाही डिजिटल साधनांच्या माध्यमातून प्रश्न मांडणे, अहवाल पाहणे आणि सभागृहात प्रभावी सहभाग घेणे शक्य होत असल्याचे त्यांनी सांगितले.

पुढील वाटचालीसाठी त्यांनी डिजिटल अभिप्राय व्यवस्था, बहुभाषिक सुविधा आणि विधिमंडळ प्रक्रिया अधिक नागरिक–केंद्री करण्याची आवश्यकता अधोरेखित केली.

पारदर्शक विधिमंडळासाठी दृढ संकल्प आपल्या भाषण अखेरीस अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांनी सांगितले की, तंत्रज्ञानाचा उपयोग केवळ कार्यालयांचे आधुनिकीकरण करण्यापुरता न राहता, शासन अधिक मानवीय बनवण्यासाठी व्हावा. महाराष्ट्र विधानसभेच्या वतीने त्यांनी देशातील विधिमंडळांच्या डिजिटल एकात्मतेसाठी आणि संघराज्य कार्यपद्धतीद्वारे लोकशाही संस्थांना अधिक सक्षम करण्यासाठी महाराष्ट्राची ठाम बांधिलकी पुन्हा एकदा व्यक्त केली.

# लोकप्रतिनिधींची उत्तरदायित्वाची भावना हाच सशक्त लोकशाहीचा पाया प्रा. राम शिंदे

लखनौ, उत्तर प्रदेश : लोकप्रतिनिधींचे जनतेप्रती उत्तरदायित्व ही केवळ नैतिक अपेक्षा नसून, सशक्त आणि गतिमान लोकशाहीसाठीची एक अनिवार्य कार्यात्मक गरज आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी केले. लखनौ येथे आयोजित ८६व्या अखिल भारतीय पीठासीन अधिकारी परिषदेच्या (एआयपीओसी) व्यासपीठावर ते बोलत होते.परिषदेच्या जनतेप्रति विधिमंडळांचे उत्तरदायित्व या विषयावर विचार मांडतांना सभापती प्रा. शिंदे म्हणाले की, लोकप्रतिनिधी आणि लोकशाही संस्थांची अधिमान्यता केवळ निवडणुकीद्वारे मिळत नाही, तर सातत्यपूर्ण पारदर्शकता, नैतिक आचरण आणि जनतेच्या आकांक्षांप्रती संवेदनशीलतेतून ती दृढ होत जाते.

लोकसभेचे अध्यक्ष, राज्यसभेचे उपसभापती तसेच देशभरातील पीठासीन अधिकारी उपस्थित असलेल्या या गौरवशाली संमेलनास त्यांनी ‘अमृत काळा’तील सामूहिक आत्मपरीक्षणाचे महत्त्वपूर्ण व्यासपीठ असे संबोधले.भारतीय संविधानिक व सांस्कृतिक परंपरेत रुजलेली उत्तरदायित्वाची संकल्पनामहाराष्ट्राच्या समृद्ध परंपरेचा संदर्भ देताना प्रा. शिंदे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या ‘हिंदवी स्वराज्य’ संकल्पनेचा उल्लेख केला, ज्यामध्ये प्रजेचे कल्याण हे राज्यकारभाराच्या (लोककल्याणकारी राज्य) केंद्रस्थानी होते. तसेच महात्मा जोतिबा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक विचारांचा संदर्भ देत, लोकप्रतिनिधी हे केवळ निवडून आलेले पदाधिकारी नसून, जनतेच्या आकांक्षांचे विश्वस्त असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

उत्तरदायित्व ही निवडणुकीपुरती, पाच वर्षांतून एकदा येणारी औपचारिक प्रक्रिया नाही. ती प्रत्येक तासाची, प्रत्येक क्षणाची सततची जबाबदारी आहे, असे सांगत त्यांनी विधिमंडळांतील बेशिस्त आणि गोंधळ यामुळे जनतेचा विश्वास डळमळीत होतो, असा इशारा दिला.लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांनी २०२० मध्ये केलेल्या वक्तव्याचा संदर्भ देताना, प्रा. शिंदे यांनी सांगितले की, विधिमंडळे ही ‘जनतेच्या आकांक्षांची मंदिरे’ आहेत आणि लोकशाहीची ताकद सभागृहातील चर्चेची गुणवत्ता व उत्तरदायित्वात प्रतिबिंबित होते. (एआयपीओसी) आणि झ२० (ऋ२० स्पीकर्स समिट) सारख्या मंचांद्वारे सुधारणा प्रक्रियेला दिशा मिळत आहे.महाराष्ट्र विधिमंडळ : उत्तरदायित्वाचा आदर्शमहाराष्ट्र विधानमंडळाच्या संसदीय परंपरांचा उल्लेख करताना प्रा. शिंदे यांनी लोकलेखा समिती आणि अंदाज समिती यासारख्या देखरेख यंत्रणांच्या भूमिकेवर भर दिला, ज्या सार्वजनिक खर्चावर कठोर नियंत्रण ठेवतात. कायदे निर्मितीत जनसहभागाला महाराष्ट्राने दिलेले महत्त्व अधोरेखित करताना त्यांनी महाराष्ट्र सार्वजनिक सुरक्षा विधेयकाच्या संदर्भात प्राप्त झालेल्या एक लाखांहून अधिक जनसूचना तपासूनच कायदा अंतिम करण्यात आल्याचे उदाहरण दिले. कायद्यांच्या निर्मितीत नागरिकांचा सहभाग वाढल्याशिवाय खरी उत्तरदायित्वाची सुरुवात होत नाही, असे ते म्हणाले. डिजिटल पारदर्शकता व ई–विधान उपक्रमतंत्रज्ञानामुळे लोकप्रतिनिधी आणि नागरिकांमधील नाते आमूलाग्र बदलले असल्याचे सांगत, प्रा. शिंदे यांनी ई–विधान आणि महाराष्ट्राने दोन दशकांपूर्वीच सुरू केलेल्या विधिमंडळ डिजिटायझेशनचा उल्लेख केला. सभागृहातील कामकाज, प्रश्नोत्तरे, उपस्थिती आणि चर्चा, कार्यवृत्ताचे संदर्भ वेळेत उपलब्ध करून दिल्यामुळे पारदर्शकता अधिक बळकट झाल्याचे त्यांनी नमूद केले.कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आणि डेटा विश्लेषणाच्या माध्यमातून तक्रार निवारणावर लक्ष ठेवले जात असून, सभागृहात दिलेली आश्वासने प्रत्यक्षात तळागाळापर्यंत पोहोचत आहेत की नाही, याची खातरजमा केली जात असल्याचेही त्यांनी सांगितले.आर्थिक शिस्त आणि नैतिक आचरणआर्थिक उत्तरदायित्वावर भर देताना, प्रा. शिंदे यांनी आमदार स्थानिक विकास निधी (एमएलए–लॅड) च्या डिजिटल देखरेखीचा उल्लेख केला आणि सार्वजनिक निधीचा वापर कसा होतो, हे जाणून घेण्याचा नागरिकांना पूर्ण अधिकार असल्याचे स्पष्ट केले.नैतिक आचरण आणि संसदीय शिस्त यांशिवाय उत्तरदायित्व अपूर्ण असल्याचे सांगत, वारंवार होणाऱ्या तहकूब व गोंधळामुळे जनतेचा विश्वास कमी होतो, असा इशारा त्यांनी दिला. विधिमंडळ हे अभ्यासपूर्ण चर्चेचे व्यासपीठ असावे; बेशिस्त, गडबड–गोंधळाचे नव्हे, यावर त्यांनी विशेष भर दिला.पुढील वाटचाल : लोकप्रतिनिधीनागरिक विश्वास अधिक दृढ करण्यासाठीउपस्थिती, चर्चेतील सहभाग व निधी वापर दर्शविणारी डिजिटल विधिमंडळ अहवालपत्रके१) नियमित नागरी संवाद/ टाउन हॉल बैठकीद्वारे लोकप्रतिनिधीनागरिक संवाद दिवस२) धोरण विश्लेषण व सार्वजनिक वित्त विषयक सततचे क्षमता–विकास प्रशिक्षण३) एआयपीओसीच्या मंचावरून प्रा. शिंदे यांनी तीन महत्त्वपूर्ण उपाय सुचविलेसामूहिक संकल्पाचे आवाहनआपल्या भाषणाच्या अखेरीस प्रा. शिंदे यांनी सांगितले की, लोकशाही ही रोजच्या उत्तरदायित्वाच्या कृतींवर टिकून असलेली जिवंत व्यवस्था आहे. संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पसायदानातील जो जे वांछिल तो ते लाहो हा संदर्भ देत, प्रत्येक नागरिकाच्या न्याय्य आकांक्षा पूर्ण व्हाव्यात, यासाठी नि:स्वार्थ भावनेने कार्य करण्याचे आवाहन त्यांनी केले. लखनौ येथे आपण सर्वांनी संकल्प करूया की, भारतीय विधिमंडळे पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि सर्वोत्तम लोकशाहीचे जागतिक मानदंड ठरतील, असेही ते म्हणाले.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर – ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर – ४१३५१२ येथे प्रकाशित केले.